पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,सामान्य प्रशासन विभाग,
क्र: सा.प्र.वि/०२/कावि/४२५/२०२४
दिनांक : २५/०७/२०२४

विषय : अतिवृष्टीमुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहिर करणेबाबत...

आदेश,

ज्याअर्थी, भारतीय हवामान खात्याने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार दिनांक २६ जुलै २०२४ रोजी पुणे जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीचा रेड अलर्टचा इशारा देण्यात आलेला आहे. पुणे जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीमध्ये अतिवृष्टी होत आहे. त्याअनुषंगाने मा.जिल्हाधिकारी यांनी पुणे जिल्ह्यातील शाळा व महविद्यालये बंद ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

त्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमांच्या शाळा आणि महाविद्यालये यांना दिनांक २६ जुलै, २०२४ रोजी सुट्टी जाहीर करणेत येत आहे. तथापि, या कालावधीत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून महापालिका प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाज करावे. तसेच पुढील काही तासांत पावसाचा जोर वाढणार असल्याने नागरिकांनी सतर्क राहावे.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति,
सर्व संबधित